लग्न म्हणजे बस्ता
बस्ता म्हणजे राजेन्द्र
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची
# नायक
सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर | बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग | होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

Sangamner ▮ MAHMAR/2018/75654 ▮ SRP/135/2022-2024 ▮ वर्ष ८ ▮ अंक ९ ▮ ७/५/२०२५ (दैनिक) ▮ किंमत रु.२/- ▮ पाने ४

फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
राजपाल मध्ये प्रत्येक खरेदीवर पॉइंट मिळवा आणि पॉइंट्स वर गिफ्ट मिळवा
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे MASALE SINCE 1992
चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे,
चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले
+91 9370584332
www.kothmiremasale.com

# युद्धकालीन परिस्थितीत नागरी बचावासाठी बुधवारी 'मॉकड्रील'!

## केंद्रीय गृहमंत्रालयाचे आदेश

## सीमावर्ती भागातील जिल्ह्यांचा समावेश

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

गेल्या २२ एप्रिलरोजी काश्मिर खोऱ्यातील पहेलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी अमानवीय हल्ला करुन २६ निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. या घटनेनंतर संपूर्ण देशात संताप निर्माण झाला असतानाच केंद्र सरकारने एकीकडे मूसद्देगिरीतून पाकिस्तानची कोंडी करण्यासह लष्कराची सज्जताही वाढवली आहे. पाकिस्तान सीमेवर लष्कराच्या हालचाली आणि युद्ध सराव सुरु झाल्याने शत्रूराष्ट्राचे धाबे दणाणले आहेत. भारत कोणत्याही क्षणी पाकिस्तानवर हल्ला करण्याची दाट शक्यता असल्याने सध्या देशाच्या सीमावर्ती भागात मोठा तणाव निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्रालयाने पाकिस्तान सीमेलगतच्या जम्मु-काश्मिरसह पंजाब, राजस्थान आणि गुजरातमधील २४४ जिल्ह्यांमध्ये बुधवारी 'मॉकड्रील' घेण्याचे आदेश दिले असून नागरिकांना शत्रूच्या हल्ल्यातून जीव वाचवण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. याआधी ५४ वर्षांपूर्वी अशाप्रकारचे मॉकड्रील घेण्यात आले होते. उद्या होणाऱ्या या युद्धपूर्व रंगीत तालीममध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचा समावेश नाही.



पंधरा दिवसांपूर्वी काश्मिर खोऱ्यातील पहेलगाम परिसरात पर्यटनासाठी गेलेल्या २५ नागरिकांना त्यांचा धर्म विचारुन दहशतवाद्यांनी गोळ्या घातल्या होत्या. यावेळी त्यांना रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका काश्मिरी तरुणाचाही या हल्ल्यात बळी गेला. या घटनेनंतर संपूर्ण देशात संताप निर्माण होवून दहशतवादाविरोधात नागरिक रस्त्यावर उतरले. केंद्र सरकारनेही हा हल्ला अतिशय गांभीर्याने घेवून अशा प्रकारची कृती करणाऱ्यांसह ती घडवून आणणाऱ्यांना त्यांनी कधी विचारही केला नसेल अशाप्रकारची शिक्षा देण्याची घोषणा करुन तिनही दलांना सज्जतेचे आदेश दिले. त्याशिवाय सिंधु पाणीवाटप करार रद्द करण्यासह राजकीय मुसद्देगिरीतून पाकिस्तानची चौफेर मोर्चेबांधणी केल्याने शत्रूराष्ट्राची कोंडी झाली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने केलेल्या तपासातून या हल्ल्यामागे पाकिस्तानचा थेट हात असल्याचे उघड झाल्याने दोन्ही देशांमधील तणावात मोठी वाढ झाली असून दोन्हींकडून सीमेवर सैन्यासह युद्धसामग्रीची तैनाती झाली आहे.

अशास्थितीत भारतीय नौदलाने कराची बंदराजवळ ठाण मांडले असतानाच भारतीय लढाऊ विमानांनी जम्मु-काश्मिर आणि पंजाब सीमेवर रफाल, मीग, सुखोई व मिराज या विमानांद्वारे जोरदार युद्ध सराव सुरु केल्याने पाकिस्तानचे धाबे दणाणले आहेत. याशिवाय भारतीय लष्कराने राजस्थान आणि गुजरातच्या सीमेवर रणगाडे, तोफांसह **(पान ३ वर)**

## महत्त्वाचे

### वैंभवीला मिळाले ८५.३३ टक्के गुण

बीड : केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची गेल्यावर्षी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. या घटनेमुळे संतोष देशमुख यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला होता. मात्र, या कठीण परिस्थितीमध्येही संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून दाखवले आहे. बारावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल सोमवारी दुपारी जाहीर झाला. या परीक्षेत वैभवी देशमुखला ८५.३३ टक्के गुण मिळाले आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवत परप्रांतीय महिलेवर अत्याचार!



**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

शादी डॉट कॉम या वेबसाईट वरून लग्नाचे आमिष दाखवून परप्रांतीय घटस्फोटीत महिलेला संपर्क साधत आणि तिला लग्नाचे आमिष दाखवत अत्याचार केल्याची घटना घडली. तसेच घर घेण्यासाठी तिच्याकडून १ लाख ८० हजार रुपये घेतले. केडगाव येथे तिच्यावर अत्याचार करून पुन्हा पैशाची मागणी केली. तिने पैसे देण्यात नकार दिला असता आरोपीने अत्याचाराचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत शिवीगाळ करून मारहाण केली.या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी सारसनगर येथील विनोद लल्लनसिंग रजपूत याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पीडित महिलेने पोलिसांत फिर्याद दिली. पीडित महिला हावडा (पश्चिम बंगाल) येथील आहे. तिच्या पहिल्या लग्नाचा घटस्फोट झाल्याने तिने दुसरे लग्न करण्यासाठी **(पान ३ वर)**

## महिलांच्या बँक खात्यातून साडेसात लाखांचा अपहार

**नायक वृत्तसेवा, राहुरी**

तालुक्यातील राहुरी खुर्द येथील ॲक्सिस बँकेच्या शाखेत क्वेस कॉर्प लिमिटेडतर्फे नियुक्त केलेल्या एका कर्मचार्याने स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करून बचत गटाच्या २९ महिला ग्राहकांच्या बँक खात्यातून एअरटेल पेमेंट बँकेच्या मदतीने ७ लाख ५३ हजार ७९२ रुपयांचा अपहार केला आहे.

FRAUD

याबाबत क्वेस कॉर्प लिमिटेडचे जनरल मॅनेजर श्रीधर मधुकर भोर, रा. डोंबिवली, मुंबई यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले, क्वेस कॉर्प लिमिटेड तर्फे भारतातील विविध क्षेत्रातील आस्थापनांना तंत्रज्ञान आणि व्यवसाय सेवांचा पुरवठा केला जातो. त्यापैकी ॲक्सिस बँक लिमिटेड आमचे ग्राहक आहे. राहुरी खुर्द येथील ॲक्सिस **(पान ३ वर)**

JOB VACANCY
जागा त्वरित भरणे आहे
अकाऊंटंट (एम.कॉम/बी.कॉम) टॅली आवश्यक जीएसटी/बॅलन्स शीट/बँकिंग चा अनुभव आवश्यक पगार - 25000/-
सिव्हील इंजिनियर (बी.ई.सिव्हील/डिप्लोमा सिव्हील) अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य पगार 20,000
मार्केटिंग साठी मुले व मुली (एम.बी.ए./ग्रॅज्युएट) पर्सनॅलिटी व मार्केटींगचा अनुभव आवश्यक पगार 20,000/-
इलेक्ट्रिकल इंजिनियर (बी.ई. इलेक्ट्रिकल) आय.टी.आय. इलेक्ट्रिकल कोर्सेस अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य पगार 20,000
साईट सुपरवाईजर स्वतःची टु-व्हिलर आवश्यक
- संपर्क - मो. 9552499399
Teacher for School Urgent Required 1) MA (BEd) English 2) Msc (Physics) 3) Msc (Math)

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

JOB VACANCY
जागा त्वरित भरणे आहे
कॉम्प्युटर ऑपरेटर (2 जागा) शिक्षण - पदवीधर
कॅशिअर (2 जागा) शिक्षण - पदवीधर
सेल्समन/सेल्सगर्ल (4 जागा) शिक्षण-पदवीधर
हेल्पर (2 जागा) 10 वी पास
ड्रायव्हर (1 जागा) ऑटोमॅटिक गाडी चालविता येणे आवश्यक
सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्स
मेनरोड, संगमनेर, जि.अ.नगर | shahane jewellers | 02425-225642
9118 42 9118/ 98 90 499 699 | smsjewellers_sangamner

आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
OM MAYUR JEWELLERS
ओम मयूर ज्वेलर्स®
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

CHAITANYA HOSPITAL SANGAMNER
चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)

डॉ.नागेश अघोर
किडनी विकार आणि प्रत्यारोपण तज्ञ
अनुभव
मागील १४ वर्षांमध्ये दोन लाखांपेक्षा अधिक डायलिसीस
उत्तर महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक किडनी प्रत्यारोपण
(kidney Transplant) या विभागामध्ये सर्वप्रथम
आंतरराष्ट्रीय रुग्णांचे किडनी प्रत्यारोपण
विरुद्ध रक्तगटाच्या अवयव दात्याकडून किडनी प्रत्यारोपण
यशस्वीरित्या सर्वाधिक रुग्णांमध्ये पार पाडण्याचा विक्रम
किडनी आजारावरील लक्षणे
चेहऱ्यावर आणि पायांवर सूज येणे | लघवी करताना आग होणे/दुखणे
भूक मंदावणे | लघवी लाल रंगाची होणे
श्वास घेण्यास त्रास होणे | मुतखडा (किडनी स्टोन)
लघवीचे प्रमाण कमी होणे
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथ्या बुधवारी

BHANDARI
भंडारी क्लॉथ सेंटर ❋ सिल्क अँड सारीज
शेरवाणी | पैठणी | प्युअरसिल्क
कुर्तापायजमा | घागरा | डिजायनर सारीज्
ब्लेजरसुट | शालू | वनपीस
इंडोवेस्टन | कांजीवरम | क्रॉप टॉप
पॅन्ट-शर्ट
क्षण समारंभात शोभा वाढवणारी वस्त्रसंपदा !
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था
शहरातले पहिले संपूर्ण ए.सी. शोरुम
मेनरोड कॉर्नर, 02425 225719
बाजारपेठ, संगमनेर

सुविचार : अंगणावरुन जशी घराची कळा समजते, तसे बोलण्यावरुन व्यक्तीमहत्त्व कळून येते. - अज्ञात

## जबाबदाऱ्यांची ढकलाढकली

गत काही वर्षांत देशात एक वेगळेच राजकारण तयार झाले आहे. ते चांगलेच पोसले गेले आहे. डेरेदार वृक्षात त्याचे रुपांतर झाले आहे. दरवर्षी ते फुला-फळांनी बहरून येते आणि सर्वसामान्य जनतेला त्याची कटू फळे चाखावी लागतात. राजकीय नेते कधी काय बोलतील याचा नेम नाही, बहुधा वादग्रस्त बोलण्यावरच त्यांचा भर असतो आणि आपले बोलणे अंगाशी येणार हे लक्षात आल्यानंतर आपण तसे बोललोच नाही असे सांगत हात झटकण्यात त्यांचा हातखंडा असतो. त्यांचा धादांत खोटेपणा जनतेच्या लक्षात येतो परंतु ती काहीच करू शकत नाही, कारण पाच वर्षांसाठी तिचे हात बांधले गेलेले असतात. वादग्रस्त बोलणा-या नेत्याचा पक्ष म्हणतो, हे त्यांचे वैयक्तिक मत आहे पक्षाचे नाही! कोण चांगले, कोण वाईट हा विषय वेगळा, पण एकूणच सर्वत्र असेच दिसून येते की, काहीही घडले तरी त्याला कोणीच जबाबदार राहत नाही. कारण चांगले निर्णय घेतले जातात परंतु त्याचे कधी कौतुक होत नाही. काही चुकीचे निर्णय घेतले जातात पण चुकीला जबाबदार कोण ते कधी बघितलेच जात नाही. चुकीच्या निर्णयामुळे लाखो लोकांचे नुकसान होते पण जबाबदारी कोणाची राहत नाही. १५ वर्षांनंतर जर एखादा मोठा नेता निर्दोष असल्याचे न्यायव्यवस्था सांगत असेल तर तुरुंगात असे कितीतरी सामान्य निर्दोषही असू शकतील त्याचे काय? जो नेता १५ वर्षे तुरुंगात खितपत पडला त्याची उमेदीची १५ वर्षे निष्कारण वाया गेली त्याचें काय? नोटबंदीपासून जातनिहाय जनगणनेपर्यंत आणि 'अग्निवीर'पासून मागे घेण्यात आलेल्या हिंदीच्या सक्तीपर्यंतचे अनेक निर्णय, अनेक घटना यांना जबाबदार कोण? कोणीच नाही! ईडीच्या ऑफिसला लागलेली आग, मंत्रालयात आग याला जबाबदार कोण? पहलगाम हल्ला असो की बँका बंद करणारी आरबीआय. कोणाचीच जबाबदारी नाही! दहशतवादी हल्ला झाल्यावर धावपळ होते पण नक्की जबाबदारी कोणाची हे कधी ठरतच नाही. कोर्टात वेळेत निर्णय दिले जात नाहीत. जबाबदार कोणीच नाही. हजारो पाकिस्तानी, बांगलादेशी सापडतात, जबाबदार कोण? भ्रष्टाचार होतात, निवडणुकीत गैरप्रकार होतात, कोट्यवधीची रोकड सापडते, जबाबदार कोण? देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाराची कीड भारतीय अर्थव्यवस्थेला खिळखिळी करत आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. प्रचंड स्वार्थ, आर्थिक हाव, असमाधानी वृत्ती आणि मुजोरी ही या भ्रष्टाचा-यांची प्रमुख लक्षणे आहेत. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी स्थिती आज प्रत्येक खात्याची झाली आहे. काम लवकर करून व्हायचे असेल तर तुम्हाला टेबलाखालून पाकीट द्यावेच लागेल हा जणू अलिखित नियमच बनला आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने अनेक सरकारी व्यवहार डिजिटल केले आहेत. मात्र भ्रष्टाचा-यांनी त्यातूनही विविध मार्ग काढले आहेत. यंदाच्या वर्षात राज्यात उघड झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणांच्या अहवालावरून महसूल खात्याने पोलिस खात्यालाही मागे टाकल्याचे दिसून येते. १ जानेवारी ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात २१२ प्रकरणांत सापळे रुचून ३०८ सरकारी कर्मचारी आणि अधिका-यांना अटक करण्यात आली. यात महसूल खात्याचे ५६ तर पोलिस खात्याचे ३१ कर्मचारी आणि अधिकारी आहेत. सर्वच सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. प्रत्येक सरकारी कार्यालयात 'लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे' अशा स्वरूपाची पाटी लावलेली असते पण या पाटीखालीच सर्वाधिक प्रमाणात लाच मागितली जाते आणि ती दिलीही जाते. परवाच 'एक रुपयात पीक विमा योजना' बंद करण्यात आली. लाडकी बहीण योजनेवरूनही वातावरण बरेच तापले होते. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने पुन्हा सत्तेत आलो तर लाडकी बहीण योजनेची दीड हजार रुपयांची रक्कम २१०० रुपये करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु आता त्यावरून हात झटकण्याचे प्रकार वाढल्याचे दिसून आले. मंत्री झिरवळ यांनी असे आश्वासन दिलेच नव्हते असे सांगत हात झटकले. नंतर त्यांनी माघार घेतली.उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेची पूर्तता करण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करण्यात येईल असे आश्वासन मी दिले नाही असे सांगत अजित पवार यांनी हात झटकले. विरोधकांनी यावर टीकेची झोड उठवली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, शेतक-यांची फसवणूक करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री पहलगाम हल्ल्यातील अतिरेक्यांपेक्षाही क्रूर झाले असल्याचे ते म्हणाले.लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचे पैसे देण्यासाठी सामान्य प्रशासन आणि आदिवासी विभागाचे मिळून ८०० कोटी रुपये वळवल्याने शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट संतप्त झाले. सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल तर खाते बंद केले तरी चालेल, अशा शब्दांत नाराजी व्यक्त करत शिरसाट यांनी अर्थखात्यावर टीकास्त्र सोडले. आदिवासी व सामाजिक न्याय विभागाचा निधी लोकसंख्येच्या आधारावर मिळतो, तो कायद्याने वळवता येत नाही. हा निधी त्या संवर्गावरच खर्च करणे बंधनकारक आहे. तो इतर खात्यांमध्ये वळवता येत नाही. अर्थखात्याची मनमानी सुरू आहे. त्यांना जे वाटते तेच खरे अशा शब्दांत संजय शिरसाट यांनी अजित पवार यांच्या खात्याविषयीची नाराजी व्यक्त केली. एकूण काय हात झटकणे, जबाबदरी झटकणे हेच सुरू आहे!

# ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर उत्पादन शुल्क विभागाला जाग!

## सात ठिकाणी छापेमारी करत एक लाखाचा मुद्देमाल जप्त

**■ नायक वृत्तसेवा, अकोले**

तालुक्यात बोकाळलेल्या अवैद्य दारू विक्री संदर्भात ग्रामस्थांच्या आणि खुद्द आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या तक्रारीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाला अखेर जाग आली. परिणामी त्यांनी तालुक्यातील सहा गावातील अवैध दारू विक्री ठिकाणावर छापेमारी करत १ लाख ९ हजार ८५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

श्रीरामपूरचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक व संगमनेर राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी अकोले तालुक्यातील ६ गावामधील ७ ठिकाणावर छापा मारत अवैद्य दारु विक्रेत्यावर कारवाई करत १ लाख ९ हजार ८५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करत मोठी कारवाई केली.

गेल्या १५ दिवसांपुर्वी अकोलेचे आमदार डॉ.किरण लहामटे यांनी बैठक घेऊन अवैद्य दारु विक्री बंद करण्याच्या सुचना उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व पोलिस अधिकारी यांना दिल्या होत्या.यावेळी



सामाजिक कार्यकर्ते हेरंभ कुलकर्णी यांनीही तीव्र भावना व्यक्त केली होती. यानंतर संगमनेर उत्पादन शुल्क विभागाचे निरिक्षक सहस्त्रबुद्धे यांनी वरिष्ठांचे आदेशाने मागील आठवड्यात नाशिक व इतर ठिकाणचे अधिकारी,कर्मचारी बरोबर घेऊन तालुक्यात अवैद्य दारु विक्रेत्यावर कारवाई करत मुद्देमाल जप्त केला होता. त्यानंतर शनिवारी सकाळी निरीक्षक सहस्त्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क विभाग श्रीरामपुरचे भरारी पथक व राज्य उत्पादन शुल्क संगमनेर विभाग यांचे अधिकारी, कर्मचारीनी एकत्रित अकोले तालुक्यातील हिवरगाव आंबरे,विरगाव फाटा,तांभोळ, निळवंडे, निब्रळ व राजुर या गावामधील ७ अवैद्य दारु

**भविष्यात सातत्याने अवैद्य दारु विक्री केंद्रावर कारवाई केली जाणार असुन याबाबतची माहिती नागरिकांनी आमच्या पर्यत पोहचवावी असे आवाहन उत्पादन शुल्क निरिक्षक सहस्त्रबुद्धे यांनी केले आहे.**

विक्री होत असलेल्या ठिकाणावर छापा मारून देशी दारु २५८.१२ बल्क लिटर व विदेशी दारु १०.२६ बल्क लिटर जप्त करून एकुण १ लाख ९ हजार ८५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील अवैद्य दारु विक्री करणाऱ्या ७ आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# आतंकवाद्यांवर प्रतिहल्ला करा!

## कुरण ग्रामपंचायतीने ठराव करून केली मागणी



**■ नायक वृत्तसेवा, संगमनेर**

काश्मीरच्या पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांची हत्या करणाऱ्या आतंकवाद्यांवर प्रति हल्ला करून त्यांचा समुळ नायनाट करावा अशी मागणी कुरण ग्रामपंचायतीने ठराव करून केली आहे.

शनिवारी कुरण ग्रामपंचायतीची ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेत सामाजिक कार्यकर्ते उबेद शेख यांनी पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आतंकवाद्यांवर प्रति हल्ला करून त्यांचा समूळ नायनाट करावा असा ठराव मांडला. त्याला तारमोहम्मद अब्बास यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी होकार दर्शवत ठराव संमत करण्यात आला. यावेळी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी उबेद शेख म्हणाले, हल्लेखोर हे पाकिस्तानात असतील तर त्यांना शोधून त्यांच्यावर आपल्या सैनिकांनी प्रति हल्ला करून त्यांना ठार करण्यात यावे, जेणेकरून परत आतंकवाद्यांना आपल्या भारतामध्ये हल्ला करण्याचा विचार त्यांच्या मनात आला नाही पाहिजे. या ग्रामसभेला सरपंच इसेशाम रियाज तसेच उपसरपंच नदीम शेख तसेच तारामोहम्मद अब्बास, लाला पटेल, म्हमापटेल,अख्तरभाई,जमीर सुलतान, दिलावर शेखलाल, नजीर अहमद, धोंडीराम मोगल, राजू करीम,ग्रामसेवक गंगाधर राऊत व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ.डॉ.लहामटे यांनी केले राघोजी भांगरे यांना अभिवादन

**नायक वृत्तसेवा, अकोले**

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आमदार डॉ. किरण लहामटे यांनी त्यांच्या स्मृतीस्थळी भेट देऊन त्यांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी आ. लहामटे यांनी राघोजी भांगरे यांनी देशासाठी दिलेल्या योगदानाची आठवण करत त्यांना आदरांजली अर्पण केली. राघोजी भांगरे हे स्वातंत्र्य संग्रामात झुंजणारे आद्य क्रांतिकारक होते. त्यांनी ब्रिटिश सत्येविरोधात लढा देताना आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करून आपण सर्वांनी समाजा हितासाठी आणि राष्ट्रगीतासाठी कार्य करावे असे ते म्हणाले. २ मे हा राघोजी भांगरे यांचा स्मृतिदिन. या दिवशी ठाण्याच्या कारागृहात राघोजी भांगरे यांना फाशी देण्यात आली. हा दिवस बलिदान दिवस म्हणून पाळला जातो. त्यांचे मुळगाव देवगांव येथे स्मृती स्मारक निर्माणाधीन असून दगडी किल्ला, मेघडंबरी व राघोजी भांगरे यांचा पूर्णाकृती पुतळा असे या स्मृती स्मारकाचे स्वरूप आहे.



या स्मृती स्मारकाचे ८ नोव्हेंबरला लोकार्पण होणार असून इंग्रजांविरोधात पहिल्यांदा बंड करणाऱ्या क्रांतिकारकांच्या स्मारकाला आवर्जून भेट द्यावी असे आवाहन आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले आहे.

यावेळी स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा ९७.४३ टक्के निकाल

**■ नायक वृत्तसेवा, संगमनेर**

गुणवत्ता पूर्ण शिक्षण असलेल्या अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली असून मार्च २०२५ एचएससी बोर्डाच्या परीक्षेमध्ये ज्युनियर कॉलेजचा निकाल ९७.४३ टक्के लागला असल्याची माहिती प्रभारी प्राचार्या श्रीमती शोभा हजारे यांनी दिली.

या निकालाबाबत अधिक माहिती देताना प्राचार्या हजारे म्हणाल्या की, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. गुणवत्ता व उत्कृष्ट निकाल हे वैशिष्ट्य स्कूलने कायम जपले आहे.







यावर्षी बारावीसाठी १५६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी १५२ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक कार्तिक बाळासाहेब साबळे याने मिळविला असून द्वितीय क्रमांक श्रेयश शरद वाळुंज याने तर तृतीय क्रमांक साक्षी अजय थोरात हिने मिळवला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आ.डॉ सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा.व्ही.बी.धुमाळ, अकॅडमी डायरेक्टर डॉ.जे.बी.गुरव, प्रभारी प्राचार्या शोभा हजारे, प्रा. उदय करपे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# टेके पाटील ट्रस्टकडून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सन्मान!

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**

तालुक्यातील वारी येथील राहुल दादा मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

वारीतील ग्रामस्थांच्या सेवेसाठी तुटपुंज्या पगारातही आपण गावचे काहीतरी देणे लागतो. या भावनेतून अहोरात्र परिश्रम करून कार्यालयीन कामकाज, सार्वजनिक पाणीपुरवठा, स्वच्छता विभागात काम करून गावची सेवा करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे ऋण व्यक्त करून सालाबादप्रमाणे अल्पोपहार, शाल व पुरुष कर्मचाऱ्यांना उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून डोक्यातील टोपी (कॅप) व महिला कर्मचाऱ्यांना स्टोल (स्कार्फ) देऊन छोटासा सन्मान केला.



तसेच मोफत मदत सेवा केंद्राचे स्वयंसेवक तथा वारी पोस्ट कार्यालयाचे पोस्टमास्तर संजय कवडे यांचा देखील सन्मान करण्यात आला. या प्रसंगी वारीचे प्रथम लोकनियुक्त सरपंच सतीश कानडे, ट्रस्टचे अध्यक्ष तथा ग्रा.पं. सदस्य पत्रकार रोहित टेके, ग्रा.प.सदस्य योगेश झाल्टे, विजय ठाकरे, मोफत मदत सेवा केंद्राचे स्वयंसेवक मदन काबरा, रवींद्र टेके, दिलीप पवार, जय ठाकरे उपस्थित होते.यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी शेषराव रगडे, मच्छिंद्र गागरे, सतीश गायकवाड, चेतन वाळुंज, विलास जगधने, मनोज जगधने, पोपट बनकर, श्रीमती बागुल, नंदा महिरे, रावसाहेब वाघ, संदीप आगे यांचा सन्मान करण्यात आला.

पान १ वरुन

**युद्धकालीन परिस्थितीत नागरी बचावासाठी बुधवारी 'मॉकड्रील'!**

मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात केल्याने पाकिस्तान तीनही बाजूने घेरला गेला आहे. त्यामुळे सीमावर्ती भागात युद्धसदृश्य स्थिती अनुभवायला मिळत असून प्रचंड तणाव जाणवत आहे. त्यातून गोंधळलेल्या शत्रूराष्ट्राकडून भारतीय सीमावर्ती नागरी क्षेत्रात हवेतून हल्ला केला जाण्याचीही शक्यता असल्याने केंद्रीय गृहमंत्रालय सतर्क झाले असून पाच राज्यातील २४४ जिल्ह्यांमध्ये 'अॅलर्ट' जारी करण्यात आला आहे. संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित झालेल्या या जिल्ह्यांमध्ये बुधवारी (ता.७) आपत्कालीन स्थितीत करावयाच्या उपाययोजनांची रंगीत तालीम होणार आहे.

या सरावातून संभाव्य हवाई हल्ल्याचा इशारा देणारा सायरन वाजल्यानंतर काय करावे, संपूर्ण काळोख (ब्लॅक आऊट) कधी करावा, हल्ला झालाच तर, त्यापासून स्वतःचा जीव कसा वा-चवावा, सीमावर्ती संवेदनशील क्षेत्रातील सरकारी कार्यालये, मुख्यालये, महत्वाच्या इमारती, प्रतिष्ठानं यांची सुरक्षा करताना कोणती काळजी घ्यावी याबाबत नागरिकांना प्रशिक्षण आणि सूचना दिल्या जाणार आहेत. यातून लोकांचे जीव वाचवण्यासह मालमत्तेचे कमीत कमी नुकसान, नागरिकांचे मनोबल उंचावणे, अंतर्गत सुरक्षा आणि सशस्त्र दलांना मदत करण्याचा भाव निर्माण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले जाणार आहे. यासर्व घडामोडी दोन देशांमधील वाढलेला प्रचंड तणाव अधोरेखीत करणाऱ्या असून कोणत्याही क्षणी युद्धाला तोंड फुटेल इतकी स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्याचे दाखवणारी आहे. या सरावात अहिल्यानगर जिल्ह्याचा समावेश नाही.

**महिलांच्या बँक खात्यातून साडेसात लाखांचा अपहार**

बँकेचे शाखाधिकारी कुंदन पाटील यांनी ई-मेलद्वारे कळविले की, क्रेस कॉर्प लिमिटेडचे किशोर संजय पोपळघट याची नोव्हेंबर २०२४ मध्ये बँकेच्या शिर्डी शाखेत बदली केली. तेव्हा राहुरी शाखेच्या कलेक्शन ऑडिट मध्ये त्याने बँकेच्या ग्राहकांच्या कर्जाच्या रकमेचा गैरवापर केल्याचे उघडकीस आले आहे.

जुलै २०२४ ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान आरोपी पोपळघट याने एअरटेल पेमेंट बँकेमध्ये स्वतःचा मोबाईल नंबर वापरून कर्जाचे अर्ज भरतो आहे, असे सांगून सर्वप्रथम बायोमॅट्रिक द्वारे ग्राहकांचे बचत खाते उघडले. खात्याचा नंबर आल्यावर ॲक्सिस बँकेच्या कर्जाची प्रक्रिया पूर्ण केली. ती कर्जाची रक्कम एअरटेल पेमेंट बँकेत वर्ग करून घेतली. त्यानंतर ओटीपीच्या माध्यमातून ग्राहकांच्या खात्यातून रोख स्वरूपात त्याचे ओळखीचे इसमाकडून (एअरटेल बँकेचा एजंट) पैसे काढून घेतले. एकुण २९ ग्राहकांचे बचत गटाच्या माध्यमातून त्यांची सर्व कागदपत्रांची पूर्तता करून व स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करून एअरटेल पेमेंट बँकेच्या मदतीने ७ लाख, ५३ हजार ७९२ रुपये रकमेचा अपहार करून त्यांची फसवणूक केली. त्यांचे सिबील खराब केले. त्यामुळे त्यांना इतर बँकेत कर्ज भेटत नाही, असेही फिर्यादीत म्हटले आहे.श्रीधर मधुकर भोर, रा. डोंबिवली, मुंबई यांच्या फिर्यादीवरून आरोपी किशोर संजय पोपळघट (वय ३१, रा. देवगाव रंगारी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) याच्या विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गु.र.न. ४७७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**लग्नाचे आमिष दाखवत परप्रांतीय महिलेवर अत्याचार!**

शादी डॉटकॉम या वेबसाईटवर प्रोफाईल अपलोड केली. त्यामुळे विनोद रजपूत याने तिच्याशी संपर्क केला. त्यानेही दुसरे लग्न करायचे आहे, असे सांगितले. तो सतत पीडितेबरोबर फोनवर बोलत असे. त्यानंतर हावडा येथे पीडितेच्या घरी बोलणे झाले. तो नगरमध्ये काम करीत असून पेटिंगचा व्यवसाय असल्याचे त्याने सांगितले. नवीन घर घेतल्यानंतर लग्न करू, असेही तो म्हणाला.नवीन घरासाठी त्याने १ लाख ८० हजार रुपये घेतले. दरम्यान, रजपूत ५ मार्च २०२५ रोजी हावडा येथे आठ दिवस राहण्यासाठी होता. त्यामुळे त्यांचे चांगलेच प्रेमसंबध जुळले. त्यानंतर १ एप्रिल २०२५ रोजी पीडिता विनोदला भेटण्यासाठी हावडा येथून नगरला आली. केडगाव शास्त्रीनगर येथे भाड्याच्या घरामध्ये राहिली. याच काळात त्याने लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला. त्यानंतर पुन्हा हावडा येथे गेले. विनोद घर घेण्यासाठी पुन्हा पैसे मागू लागला. त्यास नकार दिला असता त्याने अत्याचार केल्याचे व्हीडिओ नातेवाईकांमध्ये व्हायरल करण्याची धमकी दिली. पीडितेने पुन्हा नगरला येऊन त्यास लग्नाबाबत विचारले असता त्याने नकार दिला.

# प्रशासनाने शेतकऱ्यांना फसवले म्हणून भावना तीव्र!

## सर्वांना हक्काचे पाणी मिळेल हा शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करा : बाळासाहेब थोरात यांचा सल्ला

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

निळवंडे कालव्यातून शेतकऱ्यांना पाणी देण्यासंदर्भात वादाचा कोणताही विषय नाही. लाभक्षेत्रातील प्रत्येक गावाला हक्काचे पाणी मिळाले पाहिजे ही पाटबंधारे विभागाची जबाबदारी आहे. त्याबाबतीत वेळापत्रक तयार करणे, ते योग्यरीत्या पाळले जाईल याचा विश्वास लोकांना देणे, ही भूमिका पाटबंधारे विभागाने घ्यायला हवी. हा विषय राहुरी किंवा राहात्याला जाणाऱ्या पाण्याच्या बाबतीत नाही, ज्याचा हक्क आहे त्याला पाणी मिळालेच पाहिजे, यामध्ये पाटबंधारे विभागाचा संवाद कुठेतरी कमी पडतो आहे,म्हणून सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घ्या चर्चेतून मार्ग निघेल असे मत ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब थोरात यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ज्याच्या त्याच्या हक्काचे पाणी ज्याचे त्याला मिळाले पाहिजे. याबाबतीत कोणतीही शंका नाही. मात्र याबाबतीत कुठेतरी



फसवणूक झाल्याची भावना झाल्यामुळे संगमनेर तालुक्यातील जनतेमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. आपल्याला फसवले जात आहे, ही भावना वाढल्यामुळे शेतकरी पाईप टाकून पाणी घेत आहेत. अशावेळी त्यांच्याशी चर्चा करायला हवी, चर्चा करून हा प्रश्न मिटविला पाहिजे आणि त्यांना विश्वास दिला पाहिजे की तुमच्या हक्काचे पाणी तुम्हाला मिळेल. मात्र असे होताना दिसत नाही, याउलट शेतकऱ्यांचे पाईप फोडले जात आहे. त्यांचे नुकसान केले जात आहे. म्हणून लोकांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत.

बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले, सरळ वागून व सहकार्य करूनही आपल्याला हक्काचे पाणी मिळत नाही, म्हणून जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला व त्यातून त्यांच्या भावना तीव्र झाल्या असे माझे स्पष्ट मत आहे. संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचा झालेला संताप जलसंपदा विभागाने समजून घ्यायला हवा.या अगोदर दोन वेळा प्रशासनाने शेतकऱ्यांना शब्द दिला मात्र त्याचे पालन केले नाही. त्यामुळे संगमनेर तालुक्यातील शेतकरी संतप्त झाले आहेत. हा वाद राहुरी, राहाता आणि संगमनेर असा नाही, कोणीही त्याला तसे स्वरूप देण्याचा प्रयत्न करू नये. राहुरी तालुक्यातील लोकही आपलेच आहे. त्यांनाही पाणी मिळालेच पाहिजे मात्र त्याच बरोबर, संगमनेर तालुक्यावर ही अन्याय होता कामा नये.

बाळासाहेब थोरात म्हणाले, निळवंडे धरण आणि कालव्यांची निर्मिती करतांना त्याच्यामध्ये लाभ क्षेत्रातील सर्व गावांना पाणी मिळेल याचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे पाण्यावर लाभ क्षेत्रातील सर्वांचा अधिकार आहे. राहुरी, राहाता तालुक्यातही आपलेच लोक राहतात. या पाण्यावर त्यांचाही हक्क आहे. मात्र पाटबंधारे विभागाचे या अगोदरच्या भूमिकेमुळे लोकांच्या मनात संशय निर्माण झालेला आहे.

प्रशासनाने या संदर्भात गावागावात बैठका घेऊन त्यांना कागदावर नियोजन समजावून सांगणे आवश्यक आहे, असे न करता शेतकऱ्यांनी टाकलेले पाईप फोडणे किंवा पाईप उपसून फेकणे हे चुकीचे आहे. यासंदर्भात जलसंपदा विभागाने चर्चा केली असती तर मार्ग निघू शकला असता. कोणतीही चर्चा न करता जलसंपदा विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी जेव्हा थेट कालव्यांवर जाऊन शेतकऱ्यांनी टाकलेले पाईप उपसून फेकत आहेत किंवा फोडून टाकत आहे, तेव्हा शेतकरी संताप व्यक्त करणे सहाजिक आहे.म्हणून सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन ज्याच्या त्याच्या हक्काचे पाणी त्यांना मिळेल हा विश्वास जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावा असे आवाहन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

# अगस्ती उच्च माध्यमिकचा १२ वी निकाल ८८.९० टक्के

**नायक वृत्तसेवा, अकोले**

येथील अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा या वर्षी देखील टिकून राहिली असून तिन्ही शाखांचा एकूण बारावीचा निकाल ८८.९० टक्के लागला असल्याची माहिती प्राचार्य डॉ.भास्कर शेळके आणि उपप्राचार्य चांगदेव डोंगरे यांनी दिली.

शाखा निहाय आणि विद्यार्थ्यांचे गुणानुक्रम गुणवत्ता पुढीलप्रमाणे कला शाखा : ७८.१२ टक्के, प्रथम कृष्णमाया बाळासाहेब यादव ९३ टक्के,द्वितीय ज्ञानेश्वरी अरविंद नाईकवाडी ८३.८३ टक्के,तृतीय प्रतीक्षा गोरक्ष कोंडवले ७९.५० टक्के,वाणिज्य शाखेचा निकाल ९२.९४ टक्के लागला असून प्रथम दीपाली बाळासाहेब जाधव ८७.८३ टक्के, द्वितीय अश्विनी रंगा गि-हे ८७.५० टक्के,तृतीय श्रद्धा दशरथ चौधरी ८६.६७ टक्के,विज्ञान शाखेचा निकाल ९७.७५ लागला असून प्रथम प्रांजली बाळू सदगीर ८१.८३ टक्के,द्वितीय यज्ञा दीपक आभाळे ७९.१७ टक्के, तृतीय ओम सयाजी झोळेकर ७५.१७ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त माजी आमदार वैभव पिचड, कायम विश्वस्त कॉ. गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त सुरेश कोते, मधुकर सोनवणे, संपतराव वैद्य तसेच अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर, प्रबंधक सीताराम बगाड यांनी अभिनंदन केले आहे.

# डॉ.भानुदास जी.डेरे इंग्लिश मिडियम स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे बारावी परिक्षेत यश

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

येथील नावाजलेल्या डॉ. भानुदास जी डेरे इंग्लिश मिडियम स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पार पडलेल्या बारावी बोर्डाच्या परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

महाविद्यालयात पहिला येण्याचा मान तेहरिम सादिक शेख हिने पटकावला असून तिला ८० टक्के गुण मिळाले. सृष्टी विनायक नागरे हिने ७४.७६ टक्के गुण मिळवत द्वितीय,वैष्णवी विठ्ठल रेवगडे ७१.६७ टक्के गुण मिळवत तृतीय, तर मिताली मंगेश उनवणे, स्वामिनी विजय भास्कर यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला.

तसेच ७० टक्के पुढील १५ विद्यार्थी, ६० टक्के पुढील १८ विद्यार्थी, ५० टक्के पुढील १५ विद्यार्थी, ४० टक्के पुढील १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.सर्वच्या सर्व ६० विद्यार्थी इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण होऊन १०० टक्के निकालाची परंपरा अखंडीत राहिली आहे. विद्यार्थ्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास जी. डेरे पाटील, उपाध्यक्ष ॲड. श्रीराज भानुदास डेरे पाटील, अंकिता श्रीराज डेरे पाटील, सी.ई. ओ. अशालता प्रशांत शेट्टी, प्राचार्या रेखा दौलत पवार, प्राथमिक विभाग उपप्राचार्या स्मिता राजेश गुंजाळ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी अभिनंदन केले आहे.

# वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**नायक वृत्तसेवा, अकोले**

■ मधुकरराव नवले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे कौतुक केले व या विद्यार्थ्यांचे आजचे यश हेच त्यांच्या भविष्यातील वाटचालीची नांदी आहे हे सर्व पालकांनी लक्षात घ्यावे असे सांगितले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या इ. पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.

या परीक्षेत अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडेमीचे विद्यार्थीनी यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा कौतुक व सन्मान सोहळा शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता. अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर नवले, प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख व प्राचार्या राधिका नवले यांच्या शुभहस्ते सर्व विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षक यांना सन्मानित करण्यात आले. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिवरत्न भूषण साठे, निशांत सुदाम सोनवणे, आरोही गिरीश नवले, शौर्य दीपक कचरे, गायत्री विशाल देशमुख, आराध्या सचिन गायकवाड, हर्षवर्धन अनिल चासकर, व्यास देवानंद आरोटे, तेजस प्रभाकर येलमामे, स्वरा सचिन नाईकवाडी, ध्रुवराज देवदत्त शेटे, विराज जगन्नाथ जाधव, ईश्वरी शरद सातपुते, अनंत गोरखनाथ खेडकर हे विद्यार्थी तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शुभम अजिनाथ कदम, ओम सुरींदर वावळे, आर्यन जनार्दन आभाळे, अनन्या विकास वणवे, भक्ती विकास साळवे, शिवराज धनेश देशमुख, ईशा विजय गलांडे, श्रद्धा चंद्रभान लांडगे, सार्थक एकनाथ तळपे व तनिष्का संतोष गायकवाड असे एकूण २४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना सुमैय्या शेख, अरुणा बगनर, मेघा भालेराव, उज्वला मुसळे, प्राजक्ता सोलपुरे, शोभा नवले, विजय जाधव, कल्पना मंडलिक, अजय हांडे, स्नेहा पेंडभाजे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विक्रम नवले, सहसचिव प्राचार्या अल्फोंसा डी. प्राचार्या राधिका नवले यांनी अभिनंदन केले. स्वागत वृषाली शेटे व प्रास्ताविक सुमैय्या शेख यांनी केले तर सूत्रसंचालन प्राजक्ता नेटके व मेघा भालेराव यांनी केले.

नायक ANCHOR

# जातीनिहाय जनगणनेचा केंद्राचा निर्णय!

## संगमनेर भाजपच्या वतीने सरकारचे अभिनंदन



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याचा नुकताच निर्णय घेतला.या ऐतिहासिक निर्णयाचे संगमनेर भाजपच्या वतीने स्वागत करण्यात आले असून केंद्र सरकारच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला.

नवनिर्वाचित भाजप शहराध्यक्ष पायल आशीष ताजणे यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिलीच बैठक पक्ष कार्यालयात पार पडली.पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अंत्योदय कल्याणाचा नारा देऊन समाजातील प्रत्येक जाती धर्मातील शेवटच्या सामान्य माणसापर्यंत लाभ कसा पोहचेल यासाठी प्रयत्न करण्याचा एकात्म मानववादाचा संदेश आपल्या कार्यकर्त्यांना दिला होता. त्याप्रमाणे केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा करून अंत्योदय उद्धाराचा पाया रचला आहे असे मत राजेंद्र देशमुख यांनी मांडले.

देशहितासाठी सर्वोच्च असलेले अनेक ऐतिहासिक निर्णय घेणारे मोदी सरकार आज पुन्हा एकदा आपल्या जातीनिहाय जनगणनेच्या लोककल्याणकारी निर्णयाने देशवासीयांच्या कौतुकास पात्र ठरले असल्याची भावना शहराध्यक्ष पायल आशिष ताजणे यांनी व्यक्त केली.तसेच येणाऱ्या काळात जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनात संगमनेर शहर व घुलेवाडी गटातील अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे सुतोवाच त्यांनी केले.

यावेळी भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते दिनेश सोमाणी यांची शहरातील अग्रगण्य महेश नागरी पतसंस्थेच्या चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी,भाजपचे ज्येष्ठ नेते रामभाऊ जाजु,डॉ. अशोक इथापे,राजेंद्र सांगळे,राजेंद्र देशमुख,वैभव लाडंगे, काशिनाथ पावसे,दिनेश सोमाणी,हरिश्चंद्र चकोर,अशोक कानवडे,प्रशांत वाडेकर,दिपक भगत,शरद गोर्डे,आशिष ताजणे,जग्गु शिंदे,सुरेखा खरे,अरुणा पवार,ज्योती भोर,अंजना भालसिंग, कांचन ढोरे, रेश्मा खांडरे, पांडुरंग शेराल,हर्षवर्धन खुळे,नितीन शिंदे,भगवान कुक्कर, दिलिप रावळ, दिपेश ताटकर,शाम कोळपकर, भारत गवळी, विशाल एनगुंदल,रविंद्र उडता, विकास गुळवे, कल्पेश पोगुल,संतोष पठाडे, योगेश लष्करे,श्रीनिवास वलूसा , श्रद्धा घोडे, मुकुंद उपरे,पप्पू तेजी, सुदर्शन इटप,सागर भोईर,मनोज जुंदरे,शिवकुमार भंगीरे, यांसह शहर व तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहिजेत
फोर व्हीलर वाहनांसाठी अनुभवी चालक पाहिजे.
जागा - ५
आकर्षक पगार व इतर सवलती
इथापे कॉलेज, संगमनेर.
७०२०८८६५६५, ९३७००७१७७७, ९८२२७९१४८४

पाहिजेत
नामांकित फॅक्टरी मध्ये जागा भरणे आहे
क्लर्क (जागा एक)
सुपरवायझर (जागा एक)
वॉचमन (जागा एक)
अनुभवास प्राधान्य
संपर्क 98 22 33 44 31

पाहिजेत 9850545333
एम. जी. काजळे ज्वेलर्ससाठी तात्काळ पाहिजेत
सेल्समन - 4 जागा (स्त्री/पुरुष)
कॉम्प्युअर ऑपरेटर - 2 जागा
पगार - 15000 ते 20000व इतर सवलती
पत्ता- एम. जी. काजळे ज्वेलर्स, जाणता राजा रोड, संगमनेर

SR THORAT DAIRY पाहिजेत GAGANGIRI PACKAGED PURITY

| अ.क्र | पदाचे नाव | जागा | शैक्षणीक पात्रता / अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सेक्युरिटी गार्ड | ५ | अनुभव किमान ५ वर्षे. (Ex-Servicemen preferred) |
| २. | ईटीपी ऑपरेटर | २ | शिक्षण १२वी व पदवीधर अनुभव किमान ४ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ३. | बॉयलर फायरमन | २ | शिक्षण १२वी अनुभव किमान २ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ४. | 1st क्लास बॉयलर ऑपरेटर | २ | अनुभव किमान ५ वर्षे, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ५. | कामगार (पुरुष) | १० | शिक्षण १२वी वय मर्यादा ३० वर्ष |

समक्ष भेटणे – एच.आर. विभागास मुळ कागदपत्रासह रविवार सोडून.
ऑफिस – एस.आर. थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा.लि. राजापूर रोड संगमनेर
मोबा. 9860100936/937
E-Mail Id: admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com

MALPANI
प्रोसेस विभागात
कामगार भरती
चालू आहे!
वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,
पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,
नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)
पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व
ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती
सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-
अधिक माहितीसाठी संपर्क
मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी
मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
मो. ८९५६९५६६१२
मो. ९८२२६०१६५२
मो. ९५५२८८१३००

'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटिंग अँण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर



शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा... राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# निळवंडेचे पाणी पेटले!

## इंद्रजीत थोरात यांच्यावर गुन्हा दाखल

### आम्हालाही सहआरोपी करा, शेतकऱ्यांची मागणी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



संगमनेर तालुक्यात निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यातील पाण्याचा वाद चिघळला असून, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक इंद्रजीत थोरात यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप पसरला असून, आम्हालाही सहआरोपी करा अशी मागणी करत त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्यात सध्या निळवंडे धरणाचे आवर्तन सुरू आहे. जलसंपदा विभागाने शेतकऱ्यांनी टाकलेले कालव्यातील अनधिकृत पाईप काढण्यास सुरुवात केली असता, शेतकऱ्यांनी याला तीव्र विरोध केला. इंद्रजीत थोरात यांनी शेतकऱ्यांचे नेतृत्व करत प्रशासनाच्या कारवाईला आव्हान दिले. जलसंपदा विभागाचे सहाय्यक अभियंता प्रमोद माने यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, निमगाव पागा ते खळी पिंपरी दरम्यान अनधिकृत पाईप काढतांना इंद्रजीत थोरात यांनी अटकाव केला. थोरात यांनी, आमच्या कारखान्याने पाईप टाकले आहेत, ते काढू नका. शेतकऱ्यांच्या जमिनी कालव्यासाठी गेल्या, त्यांना आधी पाणी द्या,असे सांगितले. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम २२१, २२३ आणि महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ९३ (१)(ख), ९३(४) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. इंद्रजीत थोरात यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. प्रशासन नियोजन देत नाही, हक्काचे पाणी उपसू देत नाही आणि वरून खोटे गुन्हे दाखल करते. हा अन्याय आहे. इंद्रजीत थोरात यांच्यासोबत आम्हालाही सहआरोपी करा, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाने योग्य पर्याय काढला नाही तर आंदोलनाशिवाय आमच्याकडेही पर्याय नसल्याचे जाखुरीचे शेतकरी रामेश्वर पानसरे यांनी सांगितले. रविवारी सायंकाळी प्रशासन, इंद्रजीत थोरात आणि शेतकऱ्यांमध्ये सामोपचाराने तोडगा निघाला होता. प्रशासनानेही तो मान्य केला होता. मग आता गुन्हा दाखल का झाला? हे संगमनेरला पाण्यापासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र आहे. गुन्हे दाखल करायचे असतील तर आमच्यावरही करा असे पिंपरणेचे शेतकरी अण्णा राहिंज यांनी म्हटले आहे.या प्रकरणाने संगमनेर तालुक्यातील वातावरण तणावपूर्ण झाले आहे. शेतकऱ्यांचा उद्रेक आणि आंदोलनाची तयारी यामुळे हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. प्रशासन आणि शेतकऱ्यांमधील तणाव कसा निवळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**शेतकऱ्यांसाठी लढणे गुन्हा आहे का?**

- जलसंपदा विभागाने यापूर्वीही शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. संगमनेर तालुक्याचे ४८ किमी लाभक्षेत्र असताना पाण्याबाबत अपेक्षित हमी दिली जात नाही. दिलेला शब्द पाळला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी लढणे गुन्हा आहे का? आम्ही यापुढेही शेतकऱ्यांसाठी लढत राहू असा इशाराही सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे जेष्ठ संचालक इंद्रजीत थोरात यांनी दिला आहे.

# जलसंपदा मंत्र्यांकडून आवर्तन वाढवून सर्व बंधारे भरुन घेणार : आ. खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



तुम्हाला या मतदारसंघातील सर्व सामान्य जनतेने घरी बसवले आहे. जनतेचा मतांचा आदर करत विनाकारण जर कोणी तालुक्याचे वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करणार असेल तर आमचे कार्यकर्ते सुद्धा तुमचा बंदोबस्त केल्याशिवाय राहणार नाहीत. असा इशारा देत या तालुक्याला पाणी देण्याचं काम आमचे आहे, ते आम्ही करणार आहे. वेळ पडल्यास जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करून पाच ते सहा दिवसाचे आवर्तन वाढवून घेत प्रत्येक गावातील ओढे, नाले, पाझर तलाव तसेच जिथे पाणी साठवण्याची क्षमता आहे ती सर्व जलस्त्रोत मी स्वतः उभा राहून भरून घेणार असल्याचा विश्वास आ. अमोल खताळ यांनी दिला.

आ. खताळ म्हणाले, यापूर्वीच्या आवर्तनात सर्व लगत गावांना पाणी मिळालेले आहे. आताचे आवर्तन सुरू झाल्यापासून गावा गावांमधील बंधारे भरले जात असताना, ओढ्याला पाणी सुरू असतांना स्टंटबाजी करण्याची गरज काय? असा प्रश्न आमदार खताळ यांनी विचारला आहे.

तालुक्यातील पिंपळे, तिगाव, पळसखेडे, चिंचोली गुरव, मालदाड या गावातील कामांचा पिंपळे येथे तर डिग्रस, खरशिंदे, रणखांबवाडी, मांडवे बुद्रुक, साकुर, वनकुटे या गावांचा एकत्रित डिग्रस येथे जलसंधारण विभागाच्या वतीने गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या योजने अंतर्गत गाळ काढणे कामाचा शुभारंभ आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना आ. खताळ बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, गेल्या चाळीस वर्षात या तालुक्यात पाणी न जिरवता एकमेकाची जिरविण्याचे काम केले गेले आहे. परंतु मला एकमेकाची जिरवायची नाही तर जमिनीमध्ये पाणी जिरवायचे आहे.राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून या तालुक्यातील कोणीही पाण्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेत आहोत. निळवंडे डावा आणि उजवा या दोन्ही कालव्यातून व्यवस्थित आवर्तन चालू आहे. हेड पासून टेलपर्यंत पाणी देण्या बाबत जलसंपदा विभागाने नियोजन केले आहे. ज्यांनी तुम्हाला ४० वर्ष पाणी न देण्याचे पाप केले आहे, त्यांनाच तुम्ही घरी बसविले आहे. माझ्या सारख्या एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलावर तुम्ही सर्वांनी विश्वास टाकला आहे. त्या विश्वासाला कुठल्याही प्रकारचा तडा न जाऊ देता सर्व लहान मोठे बंधारे व पाझर तलाव भरून देण्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे. ती मी पार पाडून सर्वांना पाणी कसे मिळेल यासाठी आवर्तन वाढविण्याची वेळ आली तरी चालेल मात्र पाण्यापासून तुम्हाला कोणालाही वंचित ठेवणार नाही. संगमनेर तालुक्याचा होत असलेला विकास व तालुक्यातील ग्रामीण भागात होत असलेल्या पाण्याच्या क्रांतीमुळे माजी मंत्र्यांना राजकारण करण्यासाठी कुठलेही मुद्दे शिल्लक राहिले नाहीत. त्यामुळे त्यांनी त्यांच्या बगलबच्च्यांना हाताशी धरून चांगल्या कामाला खोडा घालण्याचे काम सुरू केले आहे.

- गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत संगमनेर तालुक्यातील डिग्रस, खरशिंदे, रणखांबवाडी, मांडवे बुद्रुक,साकुर, वनकुटे तसेच पळसखेडे, तिगाव, पिंपळे, चिंचोली गुरव, मालदाड या गावामधील पाझर तलावातील गाळ उपसण्याचे काम सुरु झाले आहे. हा गाळ काढल्यानंतर निश्चितच पावसाळ्यात पाझर तलावात पाणी साचून त्याचा वरील गावातील शेतकऱ्यांना उपयोग होईल. यासाठी लोकपंचायत यंत्रणेने चांगल्या दर्जाचे काम करावे अशी सूचना आमदार अमोल खताळ यांनी जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

नायक ANCHOR

# अवैध धंदे बंद करा अन्यथा उपोषणाला बसेल!

### आ.लहामटे यांचा पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाला इशारा



**नायक वृत्तसेवा, अकोले**

अवैध दारू मिळत असणाऱ्या गावांची यादी देऊनही पोलिस आणि उत्पादन शुल्क विभाग ती दारू थांबवत नसतील तर आणखी १५ दिवस वाट बघून अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मी स्वतः उपोषणाला बसेल असा निर्वाणीचा इशारा आमदार डॉ. किरण लहामटे यांनी पोलिस व उत्पादनशुल्क विभागाला दिला.

सोमवारी अकोले तालुक्यातील सरपंच,उपसरपंच,पोलिस पाटील,ग्रामसेवक व दारुबंदी कार्यकर्ते यांच्या संयुक्त बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना जिथे दारू सुरू आहे तेथे काय कारवाई केली? याचा जाब विचारला व संतापून निर्वाणीचा इशारा दिला.

ज्या दारू दुकानातून दारू येते, त्या दुकानावर कारवाई का होत नाही? ती कारवाई करून नियम मोडणाऱ्या परवाना धारक दुकानांना सील ठोका.जागा मालकावर गुन्हे दाखल करा आणि ज्या बीट मध्ये दारू सापडेल त्या बीट अंमलदारावर कारवाई झालीच पाहिजे असे अत्यंत आक्रमक होत त्यांनी आदेश दिले.

यावेळी प्रास्ताविक करताना हेरंब कुलकर्णी यांनी सरपंच व पोलिस पाटील यांनी अवैध धंदे चालवणाऱ्या व्यक्तींशी वाईटपणा घेण्याची तयारी दाखवावी व गावाला संघटित करून याविरुद्ध आक्रमक व्हावे. व्यसनमुक्तीसाठी प्रबोधन करावे व गावात ग्रामसुरक्षा दल स्थापन करावे असे आवाहन केले. सामाजिक कार्यकर्ते विनय सावंत यांनी तालुक्यातील जनतेच्या सहन शक्तीची परीक्षा बघू नये.अन्यथा तालुक्यातील जनता अधिकाऱ्यांविरुद्ध रस्त्यावर उतरेल असा इशारा दिला. मच्छिंद्र देशमुख यांनी लहान मुले नशेखोर शीतपेयाला बळी पडतात असे सांगितले. यावेळी कार्यकर्ते नीलेश तळेकर, सुरेश नवले, विविध सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पोलिसांना अनेकदा तक्रारी करूनही पोलिस कारवाई करण्याची टाळाटाळ करतात, धाडी टाकण्या अगोदर अवैध दारू वाल्यांना फोन करतात.किती वेळा तक्रारी करायच्या अशा संतप्त भावना त्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी ॲड. वसंतराव मनकर,खंडूबाबा वाकचौरे, अनिल कोळपकर, भाऊसाहेब वाकचौरे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे व गटविकास अधिकारी माने उपस्थित होते.

- उत्पादन शुल्क अधिकारी सहस्त्रबुद्धे यांनी झालेल्या कारवायांची माहिती दिली व १५ दिवसात जास्तीत जास्त कारवाया केल्या जातील असे सांगितले पण त्यांना संतप्त सरपंच, उपसरपंच व कार्यकर्ते यांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

गव्यम पशु आहार
या उत्कृष्ट पशुखाद्य विक्रीसाठी
सेल्स प्रमोटर - ५ जागा
(आकर्षक पगार व सुविधा)
पाहिजेत
▪ महाराष्ट्रातील रिजन मध्ये व संगमनेर तालुक्यातील दूध संकलन केंद्रामध्ये फिरण्याची तयारी आवश्यक.
▪ टु-व्हिलर व फोर-व्हिलर येणे आवश्यक.
▪ टॅब चालविण्याचे ज्ञान आवश्यक.
संपर्क
गव्यम आयुर्वेदिक पशु आहार
हल्दी, तुलसी, शतावरी, धान्य व तेलबिया, हायप्रोटीन खाद्य युक्त
ऑफीस - C/o. पडतानी इंडस्ट्रीज, जोशी हॉटेल मागे, संगमनेर
9142003939

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सौंदर्य म्हणजे नेहमीचं तारुण्य
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605
DEVISH ADVERTISER - 9850983394

श्री कळसेश्वर महाराज श्री गणेशाय नमः श्री संत सेना महाराज
#1 CUT'S Hair & Beauty Studio
ONE CUT WIG CENTRE
काही मिनिटातच तारुण्य अवस्थेतील केस परत मिळवा..
टक्कल पडलेय नो टेन्शन त्यावर आहे आता नवीन ऑप्शन
Before After
ऑपरेशन विना तारुण्यावस्थेतील केस परत मिळवा
₹ 10,000 ₹ 6,999/-
पत्ता - अभंग पेट्रोल पंपासमोर, पेटीट हायस्कुल अकोले रोड, संगमनेर
मो. 9511233837 / 9142255255

28 वर्षांची विश्वासार्ह परंपरा!
MUTUAL FUNDS Sahi Hai
गुंतवणुकीची प्रत्येक स्टेप तुमच्या आर्थिक स्वप्नपूर्तीकडे
SIP
SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
म्युच्युअल फंड्स, एस.आय.पी., पी.एम.एस., एन.पी.एस., सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन, सिस्टीमॅटीक ट्रान्सफर प्लॅन, टर्म लाईफ इन्शुरन्स, मेडीक्लेम
AMFI Certified म्युच्युअल फंड वितरक
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर

शुभ विवाह महोत्सव
आपल्या लाडक्या मुलीच्या कन्यादाना साठी ८५०००/- रुपयांपासून पुढे भांडी व फर्निचर खरेदी करा
२५०००/- रुपयांचे हनिमून पॅकेजचे मानकरी व्हा ..!
प्रत्येक बस्त्यावर Traveler Bag हमखास मोफत मिळवा.
अगदी कमी ग्राहकांच्या संख्ये मधून मानकरी होता येईल..!
ऑफर कालावधी : २० एप्रिल ते ३० जून पर्यंत लागू.
* नियम व अटी लागू.
जिव्हाळा आंतरिक... वस्तू अत्याधुनिक ..!
गृह वस्तू भांडार®
• फर्निचर • भांडी • इलेक्ट्रॉनिक्स
शाखा नं. 1 व 2 (IFB Point): बाजारपेठ, संगमनेर । मो. 7719047007
शाखा नं.3 समनापूर गणपती मंदिराजवळ संगमनेर । मो. 9175569966

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय KH
कुटे हॉस्पिटल अॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५